| Publication | Edition | Date | Page No. | Subject |
|---|---|---|---|---|
| Maharashtra Times | Mumbai | 16/05/2019 | 01 | Sunny Pawar wins 'The Best Child Actor' Award |

# मुंबईच्या सनीची लखलखती कामगिरी

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

**न्यूयॉर्क फेस्टिव्हलमध्ये ठरला सर्वोत्कृष्ट बालकलाकार**

सहजसुंदर अभिनयाने 'ऑस्कर' पुरस्कार सोहळ्यात छाप पाडलेल्या सनी पवार याने पुन्हा एकदा भारताची मान जागतिक सिनेसृष्टीत उंचावली आहे. 'लायन'फेम सनीला '१९व्या न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हल २०१९'मध्ये ('एनवायआयएफएफ') त्याच्या 'चिप्पा' सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट बालकलाकार पुरस्कार जाहीर झाला आहे.

'१९व्या एनवायआयएफएफ'मध्ये अनेक हिंदी आणि भारतीय प्रादेशिक भाषांतील सिनेमांचे सादरीकरण करण्यात झाले. त्यात लेखक-दिग्दर्शक सफदार रेहमान यांच्या 'चिप्पा' सिनेमाचा समावेश होता. रस्त्यावर राहणाऱ्या एका लहान मुलाच्या इच्छा-आकांक्षांची कथा 'चिप्पा'मध्ये आहे. कोलकात्याच्या रस्त्यावर राहणाऱ्या लहान मुलाची रंजक गोष्ट यात कथन करण्यात आली आहे.



भारतात 'मामि २०१८'सह 'एनवायआयएफएफ'मध्ये प्रीमियर सादर झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये 'चिप्पा'चे स्क्रीनिंग झाले. यात लॉस एंजेल्स, मिपकॉप आदी इंडियन फिल्म फेस्टिव्हल्सचा समावेश होता. सनीसुद्धा प्रत्यक्षात अशाच गरीब वस्तीत राहणाऱ्या कुटुंबातील मुलगा आहे. त्यामुळे सिनेमातील त्याच्या भूमिकेची तळमळ त्याने त्याच्या प्रत्यक्ष आयुष्यात देखील जगली आहे. यापूर्वीही 'लायन'साठी सनी पवार याला समीक्षक निवड पुरस्कारांतर्गत सर्वोत्कृष्ट बालकलाकार श्रेणीतही नामांकन मिळाले होते.

➤ नवे कौतुक...८

> दिग्गज परीक्षकांसमोर सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा पुरस्कार मिळण्याचा अनुभव समाधानकारक आणि माझ्यातील कलाकाराचा उत्साह वाढवणारा होता. – सनी पवार

# सनी पवारचे नवे कौतुक

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

'लायन' चित्रपटातील बालकलाकार सनी पवार याने '१९व्या न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हल २०१९'मध्ये त्याच्या 'चिप्पा' सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट बालकलाकार मिळवला. जागतिक सिनेसृष्टीकडून त्याचे नव्याने कौतुक झाले आहे.

यापूर्वी सनी याला एएसीटीए पुरस्कारांतर्गत सर्वोत्कृष्ट अभिनेता, आशिया-पॅसिफिक स्क्रीन पुरस्कारांतर्गत विशेष नामोल्लेख ग्रॅण्ड ज्युरी पुरस्कार आणि बालकलाकार पुरस्कार या विभागात नामांकन मिळाले आहे. सध्या जगभर गाजत असलेल्या सनीच्या 'चिप्पा' सिनेमात त्याच्यासोबत चंदन रॉय सन्याल, मसूद अख्तर, सुमीत ठाकूर आणि माला मुखर्जी यांनी प्रमुख सहाय्यक भूमिका वठवल्या आहेत. याविषयी सनी म्हणतो, "'चिप्पा' हा माझा दुसरा चित्रपट आहे. हा चित्रपट नेहमीच माझ्यासाठी खास असेल. दिग्गज परीक्षकांसमोर सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा पुरस्कार मिळण्याचा अनुभव समाधानकारक आणि माझ्यातील कलाकाराचा उत्साह वाढवणारा होता. माझ्यातील उत्तम ते कॅमेऱ्यासमोर आणल्याबद्दल मी सफदार रेहमान आणि चिप्पा चित्रपटाच्या टीमचे आभार मानतो.'